तरूण भारत

# अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील यांचे निधन

प्रतिनिधी
कोल्हापूर

गेली ५० वर्षे अर्थशास्त्रासारख्या जटील विषयावर हुकूमत गाजवत हजारो विद्यार्थ्यांना घडविणारे, केंद्र आणि राज्याच्या बजेटविषयी सुलभ भाषेत माहिती देणारे ज्येष्ठ अर्थशास्त्रज्ञ आणि शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागाचे माजी विभागप्रमुख डॉ. जे. एफ. पाटील (वय ८२, रा. तारा टेरेस, राममंगल कार्यालयाजवळ, शिवाजी विद्यापीठ एनसीसी भवन यांचे बुधवारी रात्री आठच्या सुमारास निधन झाले. हृदयविकाराचा धक्का बसल्याने त्यांना शनिवारी खासगी रुग्णालयात दाखल केले होते. उपचार सुरू असतानाच त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, सून, जावई असा परिवार आहे. आज



## पंचगंगा स्मशानभूमीत आज अंत्यसंस्कार

गुरुवारी सकाळी ९ वाजता त्यांच्या पार्थिवावर पंचगंगा स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

डॉ. पाटील यांच्या निधनाने अर्थशास्त्रातील शिक्षक, प्राध्यापक, लेखक, अर्थतज्ज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, अर्थसल्लागार, मार्गदर्शक आणि वक्ता असे इकॉनॉमिक्समधील

पान ९ पहा

### तरूण भारतशी निकटचा संबंध

दैनिक तरूण भारतशी डॉ. जे. एफ. पाटील यांचे निकटचे संबंध होते. ते केंद्राचे, राज्याचे बजेट असेल किंवा अनेक प्रासंगिक घटनांवर तरूण भारतमध्ये लिखाण करीत होते. तसेच तरूण भारतच्या संपादकीय पानावर अर्थशास्त्र विषयावर ते लिखान करीत होते. तसेच ते तरूण भारतच्या सल्लागार मंडळावरही होते.

# अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील यांचे निधन

पान १ वरुन

बहुआयामी व्यक्तिमत्व काळाच्या पडद्याआड गेल्याची प्रतिक्रिया व्यक्त होत आहे. डॉ. जयकुमार आजगोंडा पाटील असे नाव असणारे डॉ. पाटील यांची शेवटपर्यंत डॉ. जे. एफ. पाटील अशीच ओळख राहिली.

डॉ. पाटील हे मूळचे सांगली जिल्ह्यातील नांद्रे गावचे. पुण्यातील गोखले इन्स्टिट्यूटमध्ये पीएच. डी. पूर्ण केल्यानंतर ते सत्तरच्या दशकात सांगलीमधील विलिंग्डन महाविद्यालयात प्राध्यापक होते. १९८४ साली शिवाजी विद्यापीठातील अर्थशास्त्र विभागात ते रूजू झाले. विद्यापीठातील अर्थशास्त्र विभागप्रमुख, विद्यापीठ विकास मंडळाचे पहिले अध्यक्ष, शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघटना अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषदेचे अध्यक्ष अशी अनेक पदे त्यांनी भूषवली. ते शिवाजी विद्यापीठातील भगवान महावीर अध्यासनाचे देणगी संकलन समिती अध्यक्षही होते.

### हजारो विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

डॉ. पाटील यांनी हजारो विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. एम. फिल., पीएच. डी. करणाऱ्या विद्यार्थ्यांचेही ते मार्गदर्शक होते. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील परिषदेत त्यांनी शेकडो संशोधन पेपर सादर केले. तसेच अर्थशास्त्रावरील शंभरहून अधिक पुस्तके लिहिण्याचा बहुमानही त्यांनी संपादन केला होता. कोल्हापूर जिल्ह्यासह राज्यातील अनेक नागरी, सहकारी बँका, पतसंस्थांचे ते मार्गदर्शक, सल्लागार होते. विविध सामाजिक संस्था, संघटनांशी त्यांचा निकटचा संबंध होता. वृत्तपत्रांसह विविध मासिक, पाक्षीकात त्यांचे लेख प्रसिद्ध झाले होते. देशातील गरीबी, सामाजिक रचना, परिस्थिती यांचा अर्थकारणावर होणारा परिणाम, जागतिक मंदी आणि परिणाम, शेअर बाजारातील चढ-उतार या विषयावर भाष्य करणाऱ्या डॉ. जे. एफ. पाटील यांनी आंतरराष्ट्रीय राजकारणाचा, संबंधांचा अर्थशास्त्रावर होणारा परिणाम याविषयीही विपुल लेखन केले होते.

### सर्वसामान्यांना बजेट समजावून सांगणारा अर्थतज्ज्ञ

केंद्रीय आणि राज्याचा अर्थसंकल्प अर्थात बजेटवर डॉ. जे. एफ. पाटील यांचे काय मत आहे? याकडे अर्थशास्त्रातील विद्यार्थी, प्राध्यापकांसह पत्रकार आणि सर्वसामान्यांचे लक्ष असायचे. कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्सच्या परिसंवादात त्यांचे भाष्य लक्षवेधी ठरत असे. अर्थशास्त्र विभागातून ते जवळपास १५ वर्षापुर्वी निवृत्त झाले होते. त्याचबरोबर मार्गदर्शनाची भूमिका ते पार पाडत. नुकत्याच झालेल्या शिवाजी विद्यापीठाच्या अधिकार मंडळाच्या निवणुकीतही ते कार्यरत होते.

### अनेक पुरस्कारांनी गौरव, सन्मान

डॉ. पाटील यांना डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाने जीवन गौरव पुरस्काराने गौरविले होते. त्याचबरोबर शासनासह अनेक संस्था, बँकांनीही त्यांना सन्मानित केले. माजी कुलगुरू डॉ. रा. कृ. कणबरकर पुरस्कार समितीवरही ते कार्यरत होते. लोकनेते खासदार सदाशिवराव मंडलिक फौंडेशनचेही ते मार्गदर्शक होते.

### विविध स्तरातून शोक व्यक्त

डॉ. पाटील यांच्या निधनावर विविध स्तरातून शोक व्यक्त होत आहे. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव व्ही. एन. शिंदे यांच्यासह डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती संजय डी. पाटील, आमदार सतेज पाटील, खासदार संजय मंडलिक यांच्यासह विविध क्षेत्रातील व्यक्तींनी शोक व्यक्त केला आहे.

### आज अंत्यसंस्कार

डॉ. जे. एफ. पाटील यांच्या पार्थिवावर आज गुरूवारी सकाळी ९ वाजता अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे. सकाळी ८ वाजता अंत्ययात्रा त्यांच्या निवासस्थानापासून सुरू होईल. पंचगंगा स्मशानभूमीत अंत्यसंस्कार होणार आहेत.

### विद्यापीठाचा लौकिक सर्वदूर पसरविणारा

डॉ. जे.एफ. पाटील म्हणजे सतत काळाच्या बरोबर चालणारे अर्थतज्ज्ञ होते. भारतातील एक महत्त्वाचे अर्थशास्त्रज्ञ म्हणून त्यांनी स्वत: नाव कमावलेच, पण त्याचबरोबर शिवाजी विद्यापीठाचे नावही उंचावले. विद्यापीठाचा साठ वर्षांचा इतिहास ग्रंथबद्ध करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या समितीचे ते सदस्य होते. त्यांनी हे काम पूर्ण करून विद्यापीठाकडे सुपूर्द केले आहे. त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल.

डॉ. डी. टी. शिर्के (कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ)

जनसंपर्क कक्ष

08 DEC 2022

लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रा. जे. एफ. पाटील यांचे निधन

## आज अंत्यसंस्कार : अर्थशास्त्रातील संशोधकांचे मार्गदर्शक हरपले

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : येथील ज्येष्ठ आणि ख्यातनाम अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. तथा जयकुमार फाजगौडा पाटील (वय ८२) यांचे बुधवारी सायंकाळी निधन झाले. त्यांनी शिवाजी विद्यापीठात अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून दीर्घकाळ काम केले.



त्याशिवाय विद्यापीठ आणि विविध सामाजिक संस्था, सरकारच्या विविध मंडळांवर सदस्य म्हणून आपल्या कार्याचा ठसा उमटवला. विद्यापीठ आणि अर्थशास्त्र विभागाचा लौकिक वाढविला. त्यांच्या निधनाने अर्थशास्त्रातील संशोधक, अभ्यासकांचे मार्गदर्शक आणि शेतीचे अर्थकारण मांडणारे अभ्यासक हरपल्याची भावना व्यक्त झाली. त्यांच्या पश्चात पत्नी कमल, मुलगा अभिनंदन, मुलगी राजलक्ष्मी, सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

शरीरातील पांढऱ्या पेशी कमी होऊन अशक्तपणा आल्याने डॉ. पाटील यांना शनिवारी राजारामपुरीतील एका खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. उपचार सुरू असताना, (पान ८ वर)

### सोप्या भाषेत अर्थसंकल्पाचे विश्लेषण...

गेल्या २० वर्षांत डॉ. पाटील यांनी केंद्रीय अर्थसंकल्पाचे सोप्या भाषेत विश्लेषण करून ते सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवले. कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्सतर्फे आयोजित चर्चासत्रात ते प्रमुख वक्ते, अध्यक्षस्थानी असायचे. महाराष्ट्रातील शेतीचे अर्थकारण विविध अंगांनी ते मांडत होते. वयाच्या ८२ वर्षांत सामाजिक न्याय आणि विकास, रोजगार या विषयावरील इंग्रजी, मराठीतील ग्रंथाचे लेखन त्यांनी केले आहे. या ग्रंथाचा कच्चा मसुदा त्यांनी गेल्या काही दिवसांपूर्वी लिहून पूर्ण केला आहे.

### 'लोकमत'कडून सन्मान...

सामाजिक-आर्थिक विकासपर लेखन डॉ. पाटील सातत्याने करत होते. त्याबद्दल सन २०१३ आणि २०१५ मध्ये 'लोकमत'ने पत्रपंडित पां. वा. गाडगीळ स्मृती सामाजिक-आर्थिक विकास लेखन पुरस्काराने त्यांना सन्मानित केले. शेतीचे अर्थकारण, अर्थसंकल्प आणि आर्थिक विषयावर ते सातत्याने 'लोकमत' मध्ये लिखाण करत होते.

# अर्थतज्ज्ञ प्रा. जे. एफ. पाटील यांचे निधन

(पान वरून)

बुधवारी सायंकाळी साडेसहाच्या सुमारास त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांची अंत्ययात्रा आज, गुरुवारी सकाळी ८ वाजता सम्राटनगर येथील अक्षय तारा टेरेसेस येथील निवासस्थानापासून सुरू होईल. पंचगंगा स्मशानभूमीत सकाळी दहाच्या सुमारास त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार होतील.

मूळचे नांद्रे (जि. सांगली) येथील असणारे डॉ. पाटील यांनी भिलवडी येथील सेकंडरी स्कूलमध्ये सन १९८० मध्ये शिक्षण क्षेत्रातील कारकीर्द सुरू केली. पुढे यशवंत कॉलेज (इस्लामपूर), आर्ट्स व कॉमर्स कॉलेज (आष्टा), विलिंग्डन महाविद्यालय (सांगली) येथे अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून काम केले. सन १९८४ मध्ये शिवाजी विद्यापीठातील अर्थशास्त्र विभागात ते रुजू झाले. या ठिकाणी प्राध्यापक, विभागप्रमुख पदावर त्यांनी काम केले. येथून सन १९९८ मध्ये निवृत्त झाले. ते महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागाचे सदस्य होते. मराठी अर्थशास्त्र परिषदेचे, शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र परिषदेचे अध्यक्ष व भारतीय कृषी अर्थशास्त्र परिषदेचे उपाध्यक्ष होते. त्यांची इंग्रजी व मराठीमध्ये अर्थशास्त्राची अनेक पुस्तके प्रसिद्ध आहेत. त्यांचे अर्थशास्त्रावर प्रासंगिक भाष्य करणारे अनेक लेख राष्ट्रीय संशोधन पत्रिकेमधून विविध वृत्तपत्र, मासिकातून प्रसिद्ध झाले आहेत. त्यांना विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले होते. त्यांचे निधन झाल्याचे समजताच रुग्णालय परिसरात विद्यापीठातील प्राध्यापक, विद्यार्थ्यांनी गर्दी केली. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, आमदार ऋतुराज पाटील, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, माजी कुलसचिव बी. पी. साबळे, आदींनी अंत्यदर्शन घेतले.

### विविध पदांवर कार्यरत

डॉ. पाटील हे समाजवादी प्रबोधिनीचे खजिनदार, डी.वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या नियंत्रक मंडळाचे सदस्य, शिवाजी विद्यापीठ पदव्युत्तर शिक्षक संघाचे अध्यक्ष, विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळाचे ते पहिले संचालक म्हणून कार्यरत होते. निवृत्तीनंतर विद्यापीठाने त्यांना रा.ना.गोडबोले युनायटेड वेस्टर्न बँकेच्या अध्यासनावर प्राध्यापक म्हणून नियुक्त केले. भगवान महावीर अध्यासन केंद्राच्या उभारणीत त्यांचे मोठे योगदान होते.

### पुरस्कारांचे मानकरी..

पुण्याच्या गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र अभ्यास संस्थेतून डॉ. पाटील यांनी 'राज्य सरकारांच्या उत्पन्न खर्चाचा अभ्यास' या विषयातून पीएच.डी. पदवी मिळविली. त्यांनी आतापर्यंत सुमारे शंभर पुस्तकांचे लेखन केले. त्यांचा 'अर्थशास्त्रीय संशोधनाची तोंडओळख' ग्रंथ पथदर्शी मानला जातो. त्यांना विविध पुरस्कार मिळाले. त्यात राज्य शासन आणि शिवाजी विद्यापीठाचा आदर्श शिक्षक पुरस्कार, 'डॉ.श्री.आ. देशपांडे जीवन गौरव पुरस्कार', 'कर्मवीर भाऊराव पाटील समाजसेवा पुरस्कार', डॉ.डी.वाय. पाटील जीवनगौरव पुरस्कार, भारतज्योती पुरस्कार आदींचा समावेश आहे.

डॉ. जे. एफ. पाटील यांच्या निधनामुळे अर्थशास्त्राच्या क्षेत्रात शिवाजी विद्यापीठाचा लौकिक सर्वदूर पसरविणारा एक ज्येष्ठ अर्थशास्त्रज्ञ काळाच्या पडद्याआड गेला. त्यांनी अनेक महत्त्वाच्या प्रासंगिक विषयांवर सातत्यपूर्ण लेखन करून संशोधकात आणि समाजात जागृती करीत राहण्याचे काम केले. विद्यापीठाचा साठ वर्षांचा इतिहास ग्रंथबद्ध करण्यासाठी नियुक्त करण्यात केलेले समितीचे ते एक महत्त्वाचे सदस्य होते.

**- डॉ. दिगंबर शिर्के**, कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ

डॉ.जे. एफ. पाटील हे अत्यंत अभ्यासू व्यक्तिमत्त्व होते. डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाच्या स्थापनेपासून त्यांचे आम्हाला मार्गदर्शन होते. कोणत्याही गोष्टीबद्दल त्यांना माहिती विचारल्यावर अगदी अचूक माहिती त्यांच्याकडून मिळत होती. नॅक सारख्या कमिटी दरम्यानचे सादरीकरण असो किंवा एखादी नवीन गोष्ट करायची असो, ते अत्यंत अभ्यासपूर्ण पद्धतीने आणि प्रभावीपणे म्हणणे मांडायचे. त्यांच्या निधनामुळे आधारवड हरपला आहे.

**- डॉ. संजय डी.पाटील**, अध्यक्ष, डॉ. डी. वाय. पाटील ग्रुप, कोल्हापूर.

सन १९९२ मध्ये शिवाजी विद्यापीठाच्या स्टुडंट कौन्सिल चेअरमन आणि सिनेट मेंबर म्हणून मी विद्यापीठाच्या राजकारणाची सुरुवात केली. तेव्हापासून सर आमच्यासाठी मार्गदर्शक होते. अर्थशास्त्राचा गाढा अभ्यास असणाऱ्या सरांनी जिल्हा नियोजन समितीचे सन्माननीय सदस्य म्हणून काम करताना जिल्ह्याच्या आर्थिक नियोजनाला चालना देण्याचे काम केले. **- सतेज पाटील**, माजी गृहराज्यमंत्री

डॉ. जे. एफ. पाटील हे लोकनेते सदाशिवराव मंडलिक यांचे निकटवर्तीय स्नेही आणि माझे मार्गदर्शक होते. व्यासंगी अर्थतज्ज्ञ, समाजवादी विचारांचे खंदे पुरस्कर्ते म्हणून सर्वदूर ख्यातनाम होते. बहुजन समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी त्यांनी नेहमीच सकस मार्गदर्शन केले. **- संजय मंडलिक**, खासदार

डॉ.जे.एफ.पाटील हे माझे गुरु, शिल्पकार होते. सामाजिक बांधिलकीतून अर्थशास्त्राचा अभ्यास आणि संशोधन करणारे विद्यार्थी त्यांनी घडवले. एका सामाजिक जाणीव असणाऱ्या अर्थतज्ज्ञाला आज महाराष्ट्र मुकला आहे.

**- डॉ. विजय ककडे**, माजी प्रमुख, अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ.

पुण्यनगरी

# ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ प्रा. जे. एफ. पाटील यांचे निधन

कोल्हापूर : प्रतिनिधी



ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. तथा जयकुमार फाजगोंडा पाटील (वय ८२) यांचे बुधवारी सायंकाळी निधन झाले. व्यासंगी प्राध्यापक म्हणून ते परिचित होते. त्यांची इंग्रजी व मराठीमध्ये अर्थशास्त्राची अनेक पुस्तके प्रसिद्ध आहेत.

अशक्तपणा आल्याने डॉ. पाटील यांना शनिवारी राजारामपुरीतील एका खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान पांढऱ्या पेशी कमी झाल्याचे निदान झाले होते. उपचार सुरू असताना बुधवारी सायंकाळी त्यांची प्राणज्योत मालवली. गुरुवारी सकाळी ८ वाजता त्यांच्या प्रतिभानगरमधील निवासस्थानापासून अंत्ययात्रा ▸▸ पान ७ वर...

# ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ प्रा. जे. एफ. पाटील यांचे निधन

**(पान १ वरून)** निघणार आहे. मूळचे नांद्रे (जि. सांगली) येथील असणारे डॉ. पाटील यांची कर्मभूमी कोल्हापूर होती. १९८० मध्ये सांगलीतील विलिंग्डन महाविद्यालयात अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून त्यांनी कारकीर्दीला सुरुवात केली, तर १९८४ पासून ते शिवाजी विद्यापीठात रुजू झाले. महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागाचे सदस्य होते. मराठी अर्थशास्त्र परिषदेचे, शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र परिषदेचे अध्यक्ष व भारतीय कृषी अर्थशास्त्र परिषदेचे उपाध्यक्ष होते. २०२१ मध्ये डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाने डॉ. डी. वाय. पाटील जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित केले.

### विद्यापीठाचा लौकिक सर्वदूर पसरविणारा ज्येष्ठ अर्थशास्त्रज्ञ हरपला

डॉ. जे. एफ. पाटील यांच्या निधनामुळे अर्थशास्त्राच्या क्षेत्रात शिवाजी विद्यापीठाचा लौकिक सर्वदूर पसरविणारा एक ज्येष्ठ अर्थशास्त्रज्ञ काळाच्या पडद्याआड गेला. त्यांनी अनेक महत्त्वाच्या प्रासंगिक विषयांवर सातत्यपूर्ण लेखन करून संशोधकांत आणि समाजात जागृती करीत राहण्याचे काम केले. देशातील एक महत्त्वाचे अर्थशास्त्रज्ञ म्हणून त्यांनी स्वतः नाव कमावलेच; पण त्याचबरोबर शिवाजी विद्यापीठाचे नावही उंचावले. त्यांचा अर्थशास्त्रातील आणि शिक्षणातील योगदानाचा वारसा पुढे नेणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल, अशी भावना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केली.

### सामाजिक बांधिलकी असणारा प्राध्यापक

डॉ. जे. एफ. पाटील यांनी माझ्यासह अनेक विद्यार्थ्यांना घडवले. इयत्ता बारावीपासून ते एमबीए अर्थशास्त्रापर्यंतची त्यांची लिहिलेली क्रमिक पुस्तके विद्यार्थी अभ्यासतात. सहज सोप्या भाषेत अर्थशास्त्र ते समजावत. समाजाविषयी बांधिलकी असणारा प्राध्यापक आपण गमावला आहे.

-डॉ. विजयकुमार ककडे, अर्थतज्ज्ञ

सकाळ

# ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ, विश्लेषक डॉ. जे. एफ. पाटील यांचे निधन

**सकाळ वृत्तसेवा**



**डॉ. जे. एफ. पाटील**

कोल्हापूर, ता. ७ : ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ व शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागाचे निवृत्त प्रमुख प्रा. डॉ. जयकुमार फाजगौंडा ऊर्फ जे. एफ. पाटील (वय ८२) यांचे आज सायंकाळी साडेसहाच्या सुमारास खासगी रुग्णालयात निधन झाले. शरीरातील पांढऱ्या पेशी कमी झाल्याने त्यांना शनिवारी (ता. ३) रुग्णालयात दाखल केले होते. अभ्यासू आणि सामाजिक जाणिवेतून आर्थिक प्रश्नांची मांडणी करणारे अर्थतज्ज्ञ अशी त्यांची ख्याती होती. त्यांच्या मागे पत्नी कमल पाटील, मुलगा अभिनंदन, मुलगी राजलक्ष्मी, सून, जावई व नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवाची अंत्ययात्रा उद्या (ता. ८) सकाळी आठला निघणार असून, त्यांच्यावर पंचगंगा स्मशानभूमीत

**पान ९ वर »**

**आर्थिक आव्हान व आभास**

**पान ११ वर »**

# ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ, विश्लेषक डॉ. जे. एफ. पाटील यांचे निधन

**» पान १ वरून**

अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

डॉ. जे. एफ. पाटील यांच्या जन्म १ एप्रिल १९४२ ला सांगली जिल्ह्यातील समडोळी गावी झाला. अर्थशास्त्र विषयात एम. ए. केल्यावर त्यांनी कासेगाव शिक्षण संस्थेचे आष्टा महाविद्यालय, विलिंग्डन महाविद्यालय येथे अध्यापक म्हणून काम केले. त्यानंतर त्यांनी पुण्याच्या गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र अभ्यास संस्थेत संशोधन करून पीएच.डी. मिळवली. यासाठी त्यांना विद्यापीठ अनुदान मंडळाची शिक्षक शिष्यवृत्ती मिळाली होती. 'राज्य सरकारांच्या उत्पन्न खर्चाचा अभ्यास' या विषयात त्यांनी पीएच.डी.साठीचा संशोधनाचा विषय होता. ते १९८२ मध्ये शिवाजी विद्यापीठात अर्थशास्त्र विभागात रुजू झाले. प्रपाठक, प्राध्यापक आणि नंतर विभागप्रमुख म्हणून ते निवृत्त झाले. ते, शिवाजी विद्यापीठातील अर्थशास्त्र परिषद, मराठी अर्थशास्त्र परिषदेचे अध्यक्ष होते. त्यांनी भारतीय कृषी अर्थशास्त्र परिषदेचे अध्यक्ष व संयोजक म्हणूनही काम पाहिले. शिवाजी विद्यापीठ पदव्युत्तर शिक्षक संघाचेही अध्यक्षपद त्यांनी भूषविले. विद्यापीठातील विद्यार्थी विकास मंडळाचे ते पहिले संचालक होते. निवृत्तीनंतर विद्यापीठाने त्यांना रा. ना. गोडबोले युनायटेड वेस्टर्न बॅंकेच्या अध्यासनावर प्राध्यापक म्हणून नियुक्त केले. त्यांनी आजपर्यंत १०० हून अधिक पुस्तकांचे लेखन केले आहे. 'अर्थशास्त्रीय संशोधनाची तोंडओळख' हा त्यांनी लिहिलेला ग्रंथ पथदर्शी मानला जातो. त्यांना आजवर अनेक पुरस्कार मिळाले. यात अर्थशास्त्र परिषदेचा 'डॉ. श्री. आ. देशपांडे जीवनगौरव पुरस्कार', 'कर्मवीर भाऊराव पाटील समाजसेवा पुरस्कार' आदींचा समावेश आहे. डॉ. जे. एफ. पाटील यांनी गेल्या २० वर्षांहून अधिक काळ देशाच्या अर्थसंकल्पाचे सोप्या भाषेत विश्लेषण करून ते सर्वसामान्यांपर्यंत पोचविले. विविध आर्थिक आणि सामाजिक प्रश्नावर भूमिका मांडण्याचे काम त्यांनी केले. विद्यापीठातील भगवान महावीर अध्यासन केंद्राच्या उभारणीत त्यांचे मोठे योगदान होते.

> **डॉ. जे. एफ. पाटील यांच्या निधनामुळे अर्थशास्त्राच्या क्षेत्रात शिवाजी विद्यापीठाचा लौकिक सर्वदूर पसरविणारा एक अर्थशास्त्रज्ञ काळाच्या पडद्याआड गेला आहे. भारतातील एक महत्त्वाचे अर्थशास्त्रज्ञ म्हणून त्यांनी नाव कमावलेच, पण त्याचबरोबर शिवाजी विद्यापीठाचे नावही उंचावले. निवृत्तीनंतरच्या कालखंडातही ते सदोदित कार्यरत राहिले. शिवाजी विद्यापीठाचा ६० वर्षांचा इतिहास ग्रंथबद्ध करण्यासाठी नियुक्त समितीचे ते एक महत्त्वाचे सदस्य होते. त्यांनी हे काम पूर्ण करून विद्यापीठाकडे सुपूर्द केले आहे. त्यांच्या अर्थशास्त्रातील आणि शिक्षणातील योगदानाचा वारसा पुढे नेणे, हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल.**
>
> **- प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ**

> **डॉ. जे. एफ. पाटील माझे गुरू होते. त्यांनी खऱ्या अर्थाने मला घडविले. सामाजिक बांधिलकीतून अर्थशास्त्राचा अभ्यास आणि संशोधन करणारे विद्यार्थी त्यांनी घडविले. महाराष्ट्र एका सामाजिक जाणीव असणाऱ्या अर्थतज्ज्ञाला मुकला आहे.**
>
> **- प्रा. डॉ. विजय ककडे**

> **डॉ. जे. एफ. पाटील हे लोकनेते सदाशिवराव मंडलिक यांचे निकटवर्तीय स्नेही होते. (कै.) सदाशिवराव मंडलिक पुरस्कार समितीचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम पाहिले. बहुजन समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी त्यांनी नेहमीच मार्गदर्शन केले. आयुष्यभर पुरोगामी आणि प्रागतिक विचारांचा आग्रह धरून त्यांनी व्रतस्थ वाटचाल केली. एक अत्यंत चिंतनशील व्यक्तिमत्त्व आज आपल्यातून कायमचे निघून गेले आहे.**
>
> **- संजय मंडलिक, खासदार**

08 DEC 2022

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अर्थशास्त्राचा गाढा अभ्यासक हरपला

**कोल्हापूर : ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील यांच्या निधनाने अर्थशास्त्राचा गाढा अभ्यासक हरपल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली.**

डॉ. जे.एफ. पाटील यांच्या निधनामुळे अर्थशास्त्राच्या क्षेत्रात शिवाजी विद्यापीठाचा लौकिक सर्वदूर पसरविणारा एक ज्येष्ठ अर्थशास्त्रज्ञ काळाच्या पडद्याआड गेला आहे. सतत काळाच्या बरोबर चालणारे अर्थतज्ज्ञ होते. त्यांनी अनेक महत्त्वाच्या प्रासंगिक विषयांवर सातत्यपूर्ण लेखन करून संशोधकात आणि समाजात जागृती करीत राहण्याचे काम केले. अनेक संदर्भग्रंथांचे वाचन केले. भारतातील एक महत्त्वाचे अर्थशास्त्रज्ञ म्हणून त्यांनी नाव कमावले.

**डॉ. दिगंबर शिर्के**
**कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ**

डॉ. जे. एफ. पाटील अभ्यासू व्यक्तिमत्त्व होते. शिवाजी विद्यापीठात प्रदीर्घ काळ विविध जबाबदाऱ्या सांभाळल्यामुळे नियमांची सखोल माहिती त्यांना होती. डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाच्या स्थापनेपासून त्यांचे आम्हाला मार्गदर्शन होते. 'नॅक'सारख्या कमिटी दरम्यानचे सादरीकरण ते अभ्यासपूर्ण पद्धतीने मांडायचे. त्यांच्या निधनामुळे एक मार्गदर्शक, आधारवड हरपला आहे.

**डॉ. संजय डी. पाटील**
**अध्यक्ष,**
**डॉ. डी. वाय.पाटील ग्रुप**

शिवाजी विद्यापीठाच्या स्टुडंट कौन्सिलच्या चेअरमन आणि सिनेट मेंबर म्हणून मी विद्यापीठाच्या राजकारणाची सुरुवात केली. तेव्हापासून सर आमच्यासाठी मार्गदर्शक होते. शिवाजी विद्यापीठाच्या जडणघडणीमध्ये त्यांचा सिंहाचा वाटा आहे. अर्थशास्त्राचा गाढा अभ्यास असणाऱ्या सरांनी जिल्हा नियोजन समितीचे सदस्य म्हणून काम करताना जिल्ह्याच्या आर्थिक नियोजनाला चालना देण्याचे काम केले. त्यांच्या निधनाने एका कर्तृत्ववान मार्गदर्शक आपल्यातून निघून गेला आहे.

**आ. सतेज पाटील**

लोकनेते सदाशिवराव मंडलिक यांचे निकटवर्तीय स्नेही, स्व. सदाशिवराव मंडलिक पुरस्कार समितीचे अध्यक्ष डॉ. जे.एफ. पाटील हे अभ्यासू आणि व्यासंगी अर्थतज्ज्ञ, समाजवादी विचारांचे खंदे पुरस्कर्ते होते. बहुजन समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी त्यांनी नेहमीच सकस मार्गदर्शन केले. आयुष्यभर पुरोगामी आणि प्रागतिक विचारांचा आग्रह धरून त्यांनी व्रतस्थ वाटचाल केली.

**खा. संजय मंडलिक**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

08 DEC 2022
पुण्यनगरी

# विद्यापीठात 'आविष्कार' संशोधन स्पर्धेचा प्रारंभ

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठस्तरीय 'आविष्कार २०२२-२३' या दोनदिवसीय संशोधन स्पर्धेस बुधवारी सकाळी विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात उत्साहात प्रारंभ झाला. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले.

गत वर्षी कोविड-१९ साथीच्या पार्श्वभूमीवर आविष्कार संशोधन स्पर्धा ऑनलाईन स्वरूपात घ्यावी लागली होती. या पार्श्वभूमीवर यंदा पुन्हा ऑफलाईन स्वरूपात स्पर्धा होत असल्याने सहभागी संशोधकांचा उत्साह ओसंडून वाहत होता. आपल्या कल्पक संशोधनाची पोस्टर, लेख, पॉवरपॉईंट सादरीकरण तसेच मॉडेल स्वरूपात मांडणी करून त्याविषयी उपस्थितांना अवगत करण्यासाठीची उत्सुकता त्यांच्यामध्ये होती. त्याचप्रमाणे स्पर्धेचे काहीसे दडपणही जाणवत होते. कुलगुरू व प्र-कुलगुरूंसह उपस्थित मान्यवरांनी सर्व सहभागी संशोधकांच्या उपक्रमांची पाहणी केली. विविध वैज्ञानिक, वैद्यकीय समस्यांपासून ते सामाजिक समस्यांपर्यंतचा वेध घेऊन त्यावर आपापल्या परीने तोडगा काढण्याचा प्रामाणिक प्रयत्न संशोधकांनी केल्याचे दिसते, असे मत कुलगुरूंनी याप्रसंगी व्यक्त केले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठस्तरीय 'आविष्कार २०२२-२३' संशोधन स्पर्धेत सहभागी स्पर्धक आपल्या संशोधनाविषयी उपस्थितांना माहिती देताना.**

या स्पर्धेमध्ये मानव्यविद्या, भाषा व ललितकला, वाणिज्य, व्यवस्थापन व कायदा, मूलभूत विज्ञान, कृषी व पशुपालन, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, वैद्यकीय व औषधनिर्माण या विविध शाखांतर्गत एकूण ७० संशोधक सहभागी झाले असून, पदवी व पदव्युत्तर गटातून ३६ आणि शिक्षक गटातून ३४ संशोधक सहभागी झाले आहेत.

दरम्यान, उद्घाटनप्रसंगी वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. एस. एन. सपली, स्कूल ऑफ नॅनोसायन्स व तंत्रज्ञानचे प्रमुख तथा स्पर्धा समन्वयक डॉ. किरणकुमार शर्मा, अर्थशास्त्राचे डॉ. पी. एस. कांबळे आदी उपस्थित होते.

तरुण भारत



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठस्तरीय अविष्कार स्पर्धेत उपस्थितांना उपकरणाची माहिती देताना संशोधक.

# अविष्कार संशोधन स्पर्धेला उत्साहात प्रारंभ

- कुलगुरु डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्‌घाटन
- संशोधकांच्या उपकरणांचे कौतुक

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठस्तरीय 'आविष्कार २०२२-२३' या दोन दिवसीय संशोधन स्पर्धेस बुधवारपासून विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात उत्साहात प्रारंभ झाला. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते व प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत स्पर्धेचे उद्‌घाटन झाले.

गतवर्षी कोविड-१९ साथीच्या पार्श्वभूमीवर आविष्कार संशोधन स्पर्धा ऑनलाईन स्वरुपात घेतली होती. या पार्श्वभूमीवर यंदा ऑफलाईन स्वरुपात स्पर्धा होत असल्याने सहभागी संशोधकांचा उत्साह वाढला आहे. आपल्या कल्पक संशोधनाची पोस्टर, लेख, पॉवरपॉईंट सादरीकरण तसेच मॉडेल स्वरुपात मांडणी केली. कुलगुरू व प्र-कुलगुरू यांनी सर्व सहभागी संशोधकांच्या उपक्रमांची पाहणी करून संशोधनाची माहिती घेतली. विविध वैज्ञानिक, वैद्यकीय समस्यांपासून ते अगदी सामाजिक समस्यांपर्यंतचा वेध घेऊन त्यावर आपापल्या परीने तोडगा काढण्याचा प्रयत्न संशोधकांनी केला आहे, असे मत कुलगुरूंनी व्यक्त केले.

अविष्कार स्पर्धेमध्ये मानव्यविद्या, भाषा व ललितकला, वाणिज्य, व्यवस्थापन व कायदा, मूलभूत विज्ञान, कृषी व पशुपालन, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान आणि, वैद्यकीय व औषधनिर्माण या शाखांतर्गत ७० संशोधक तर पदवी व पदव्युत्तर गटातून ३६ आणि शिक्षक गटातून ३४ संशोधक सहभागी झाले आहेत. यावेळी वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. एस. एन. सपली, स्कूल ऑफ नॅनोसायन्स व तंत्रज्ञानचे प्रमुख तथा स्पर्धा समन्वयक डॉ. किरणकुमार शर्मा, अर्थशास्त्राचे डॉ. पी. एस. कांबळे, शिक्षक, संशोधक, विद्यार्थी उपस्थित होते.

0 8 DEC 2022

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात नवसंशोधनाचे दर्शन : आविष्कार महोत्सवात विविध प्रकल्पांचे सादरीकरण

# बहुउपयोगी कृषी बॅग, हेडफोनवर चालणाऱ्या व्हीलचेअरने वेधले लक्ष

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शेतातील कामासाठी उपयोगी ठरणारी कृषी बॅग, स्मार्ट व्हिलेज, हेडफोन आणि मोबाइलद्वारे नियंत्रित होणारी दिव्यांगांसाठीची व्हीलचेअर, अशा विविध स्वरूपांतील नवसंशोधनाचे दर्शन शिवाजी विद्यापीठात बुधवारी घडले. विद्यापीठस्तरीय आविष्कार संशोधन महोत्सवात पदवीचे विद्यार्थी, शिक्षकांनी संशोधनपर विविध प्रकल्प सादर केले. कोरोनानंतर दोन वर्षांनी ऑफलाइन स्वरूपात यंदा महोत्सव झाला.

विद्यापीठातील राजमाता जिजाऊसाहेब सभागृहामधील या महोत्सवाचे उद्घाटन कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते झाले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, श्रीकृष्ण महाजन, प्रकाश गायकवाड, एस. एन. सपली, किरणकुमार शर्मा, पी. एस. कांबळे उपस्थित होते. कराडमधील एसजेएम कॉलेजकडून पद्माकर तपासे, अमृता जाधव, योगिता निकम यांनी शेतातील तोडणी, खत फवारणी, आदी कामांसाठीच्या बहुउपयोगी कृषी बॅगचे संशोधन सादर केले. साताऱ्यातील वाय. सी. कॉलेजच्या निकिता सपकाळ, राधा शिंदे यांनी नारळाच्या शेंड्यापासून बनविलेले पॅकेजिंग मटेरियलचा प्रकल्प मांडला. कोल्हापुरातील न्यू कॉलेजच्या ऋतुजा पाटील, स्वरूपा पाटील यांनी दिव्यांगांसाठी उपयुक्त ठरणाऱ्या मोबाइल, हेडफोनद्वारे नियंत्रित करता येणाऱ्या व्हीलचेअरचे संशोधन सादर केले. या कॉलेजच्या अन्य विद्यार्थ्यांनी स्मार्ट व्हिलेजची संकल्पना मांडली. या महोत्सवात एकूण ७० संशोधक सहभागी झाले. त्यांची उपकरणे, प्रकल्प पाहण्यासाठी विद्यार्थ्यांनी गर्दी केली.

## विविध विषय

या महोत्सवात काही स्पर्धकांनी भित्तिचित्राच्या माध्यमातून कोल्हापुरातील महापुराची समस्या, स्वनिधीतून शेतकरी सक्षमीकरण, कृत्रिम बुद्धिमता, यांची मांडणी केली.

मूलभूत संशोधनाच्या जोडीला आता ॲप्लिकेशन-बेस्ड संशोधनाची जाणीवही संशोधकांना होऊ लागल्याची बाब समाधानकारक आहे.

**- डॉ. दिगंबर शिर्के,** कुलगुरु



शिवाजी विद्यापीठात बुधवारी आविष्कार संशोधन महोत्सव झाला. त्यात न्यू कॉलेजच्या विद्यार्थिनींनी हेडफोन, मोबाइलद्वारे नियंत्रित होणाऱ्या व्हीलचेअरचे संशोधन सादर केले.

0 8 DEC 2022
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'आविष्कार' स्पर्धेला शिवाजी विद्यापीठात प्रारंभ

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ७ : शिवाजी विद्यापीठस्तरीय 'आविष्कार २०२२-२३' या दोन दिवसीय संशोधन स्पर्धेस आज सकाळी विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात उत्साहात प्रारंभ झाला. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत स्पर्धेचे उद्‌घाटन करण्यात आले.

गत वर्षी कोविड-१९ साथीच्या पार्श्वभूमीवर आविष्कार संशोधन स्पर्धा ऑनलाईन स्वरुपात घ्यावी लागली होती. या पार्श्वभूमीवर यंदा पुन्हा ऑफलाईन स्वरुपात स्पर्धा होत असल्याने सहभागी संशोधकांचा उत्साह ओसंडून वाहात होता. आपल्या कल्पक संशोधनाचे पोस्टर, लेख, पॉवरपॉईंट सादरीकरण तसेच मॉडेल स्वरुपात मांडणी करून त्याविषयी उपस्थितांना अवगत करण्यासाठीची उत्सुकता त्यांच्यामध्ये होती.



कोल्हापूर : 'आविष्कार' स्पर्धेत संशोधन सादर करताना विद्यार्थी.

कुलगुरू व प्र-कुलगुरूंसह उपस्थित मान्यवरांनी सर्व सहभागी संशोधकांच्या उपक्रमांची पाहणी केली. त्यांच्या संशोधनाविषयी जाणून घेतले. विविध वैज्ञानिक, वैद्यकीय समस्यांपासून ते अगदी सामाजिक समस्यांपर्यंतचा वेध घेऊन त्यावर आपापल्या परीने तोडगा काढण्याचा प्रामाणिक प्रयत्न संशोधकांनी केल्याचे दिसते, असे मत कुलगुरूंनी या प्रसंगी व्यक्त केले. मूलभूत संशोधनाच्या जोडीला आता ॲप्लीकेशन-बेस्ड संशोधनाची जाणीवही संशोधकांना होऊ लागल्याची बाब समाधानकारक असल्याचे त्यांनी सांगितले. या स्पर्धेमध्ये मानव्यविद्या, भाषा व ललितकला, वाणिज्य,. व्यवस्थापन व कायदा, मूलभूत विज्ञान, कृषी व पशुपालन, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान आणि वैद्यकीय व औषधनिर्माण या विविध शाखांतर्गत एकूण ७० संशोधक सहभागी झाले असून पदवी व पदव्युत्तर गटातून ३६ आणि शिक्षक गटातून ३४ संशोधक सहभागी झाले आहेत.

उद्‌घाटनप्रसंगी वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. एस. एन. सपली, स्कूल ऑफ नॅनोसायन्स व तंत्रज्ञानचे प्रमुख तथा स्पर्धा समन्वयक डॉ. किरणकुमार शर्मा, अर्थशास्त्राचे डॉ. पी. एस. कांबळे यांच्यासह शिक्षक, संशोधक व विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

08 DEC 2022

सकाळ

# लोकमाध्यमातील ज्ञानाच्या संवर्धनाची गरज

डॉ. नंदकुमार मोरे; 'संवादाचे प्रभावी साधन-लोकमाध्यमे' कार्यशाळा

कोल्हापूर, ता. ७ : महाराष्ट्र लोकमाध्यमांनी घडविला आहे. लोकमाध्यमात जनमत निर्मितीची प्रचंड मोठी क्षमता आहे. ही क्षमता लक्षात घेऊन लोकमाध्यमांचे आणि लोकमाध्यमातून आलेल्या ज्ञानाचे जतन व संवर्धन करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. नंदकुमार मोरे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात जर्नालिझम आणि मास कम्युनिकेशन विभागातर्फे आयोजित 'संवादाचे प्रभावी साधन-लोकमाध्यमे' या कार्यशाळेच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. पत्रकारिता अधिभागात 'संवादाचे प्रभावी साधन-लोकमाध्यमे' या विषयावर दोनदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेचे उद्‌घाटन प्रा. मोरे यांच्या हस्ते झाले.



प्रा. नंदकुमार मोरे

'महाराष्ट्रातील लोकमाध्यमे' या विषयावर बोलताना प्रा. मोरे म्हणाले, की महात्मा फुले यांच्या कार्याचा पाया लोकमाध्यमेच होती. छत्रपती शिवरायांचा पोवाडा लिहून त्यांनी छत्रपतींचे विचार लोकमाध्यमातून सर्वसामान्य लोकांपर्यंत पोचविले. लोकसमूहाचा आवाज प्रस्थापित यंत्रणेपर्यंत पोचविण्याचे काम त्याकाळी याच लोकमाध्यमांनी केले. संत तुकारामांची गाथा, कबीरांचे दोहे, अण्णा भाऊ साठे यांची शाहिरी, गाडगेबाबांची कीर्तने आणि ज्ञानेश्वरांच्या ओव्यांनी समाजप्रबोधन केले. ही सर्व लोकमाध्यमे आहेत. भारतीय समाजात प्रचंड पारंपरिक ज्ञान आहे. त्या ज्ञानाचे संकलन आणि जतन करून पुढच्या पिढीकडे त्याचे हस्तांतरण करायला हवे. बौद्ध तत्त्वज्ञानातील अनेक चांगल्या गोष्टी पुढील पिढीकडे घेऊन जायला हव्यात.

कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रात सुनीलकुमार सरनाईक यांनी 'भजन : संवादाचे माध्यम' या विषयावर मार्गदर्शन केले. विभागप्रमुख प्रा. डॉ. निशा पवार यांनी प्रास्ताविक केले. डॉ. शिवाजी जाधव यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली.

08 DEC 2022
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ प्रथम स्थानावर

## महाराष्ट्र राज्य २४ वा क्रीडा महोत्सव मैदानी स्पर्धा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात शनिवार, दि. ३ डिसेंबरपासून सुरू झालेल्या राज्य आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सवात शिवाजी विद्यापीठ प्रथम स्थानावर आहे. मैदानी स्पर्धेत १० सुवर्ण, ४ रौप्य आणि ४ कास्यपदकांची कमाई केली आहे.



**कोल्हापूर : क्रीडा महोत्सवामध्ये सहभागी झालेला विद्यापीठाचा संघ.**

यामध्ये निखिल पाटील १०० मी.मध्ये सुवर्ण, इंद्रजित फराकटे १५०० मी. सुवर्ण, रोहिणी पाटील १५०० मी. सुवर्ण, सुशांत जेधे ५००० मी. सुवर्ण, श्रावणी देसावळे उंच उडीमध्ये सुवर्ण, प्रफुल्ल थोरात थाळीफेक रौप्य, प्राजक्ता शिंदे ५००० मी. रौप्य, सिद्धी कारंडे थाळीफेक कास्य, प्रतीक पाटील १०० मी. कास्य, सत्यजित पुजारी १५०० मी. कास्य, सिद्धी कारंडे गोळाफेक कास्य, सुशांत जेधे ५००० मी. सुवर्ण, प्राजक्ता शिंदे रौप्य, संपदा धुमाळ लांब उडीमध्ये सुवर्ण, प्रफुल्ल थोरात शॉट पटमध्ये सुवर्ण, शुभम जाधव भालाफेकमध्ये सुवर्ण, त्याचबरोबर बास्केटबॉल खेळामध्ये महिला व पुरुष संघ, खो खोच्या महिला पुरुष संघाने तसेच कबड्डीच्या पुरुष संघाने सेमी फायनल फेरीमध्ये प्रवेश केला आहे.